मसुदा
क्र.    /२०१७–१८

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा ***सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी संध्याकाळी ५.०० वाजता*** सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते:–

१. डॉ. देवानंद शिंदे – (प्रभारी कुलगुरू) (अध्यक्ष)
२. डॉ. विष्णू मगरे – (प्रभारी प्र–कुलगुरू)
३. डॉ. दिनेश कांबळे – (प्रभारी कुलसचिव) (सदस्य सचिव )
४. श्री. प्रमोद नाईक – (सहसंचालक, तंत्रशिक्षण, मुंबई विभाग)
५. डॉ. रोहीदास काळे – (सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग)
६. डॉ. मुरलीधर कु–हाडे – (सदस्य)
७. डॉ. (रश्मी ओझा) – (सदस्य)
८. प्रा.डॉ. गौतम गवळी – (सदस्य)

श्री. विजय फ. तायडे, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी आणि डॉ. अर्जुन घाटुळे, स्थानापन्न संचालक, परिक्षा व मुल्यमापन हे निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

➢ **स्वागत :–**

कुलसचिवांनी स्वतःच्या तसेच विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने उपस्थित सर्व सन्माननीय सदस्यांचे हार्दिक स्वागत केले.

➢ श्रध्दांजली

**श्री. अरविंद जोशी**

कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे ठाण्यातील प्रणेते आणि कॅन्सरग्रस्त रूग्णांना आधारभूत ठरलेली आधार रेषा या संस्थेचे संस्थापक श्री. अरविंद जोशी यांचे दिर्घ आजाराने दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६३ वर्षांचे होते.

**श्री. शशी कपूर**

हिंदी चित्रपटसृष्टीचे जेष्ठ अभिनेते श्री. शशी कपूर यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०४ डिसेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७९ वर्षांचे होते.

**डॉ. मार्सिलीन अल्मेडा**

प्रख्यात वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. मार्सिलीन अल्मेडा यांचे वृध्दापकाळाने दिनांक ०५ डिसेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

**श्री. अशोकराव मु. आंबेडकर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू तसेच भारतीय बौध्द महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. अशोकराव मु. आंबेडकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक ०८ डिसेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

तसेच मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी जे या काळात निधन पावले त्यांनाही श्रंध्दाजली वाहण्यात आली.

**बाब १: दिनांक २८ नांव्हेंबर, २०१७ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.** — EAU

ठराव : असा ठराव करण्यात आला की, दिनांक २८ नोव्हेंबर, २०१७ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त दुरूस्तीसह मंजूर करण्यात आले.

दुरूस्ती — बाब क्र. १८ मध्ये ठरावामध्ये 'विद्या' ऐवजी 'संध्या' वाचावे.

**बाब २: दिनांक २२ सप्टेंबर २०१७, रोजीच्या व्यवस्थापन परिषदेचा कार्यवाही-अहवाल सादर.** — EAU

ठराव : असा ठराव करण्यात आला की, दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावर केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

I/c Director Confucius Institute

बाब ३: **Remuneration increment of visiting faculty at Confucius Institute, University of Mumbai.**

ठराव : It was resolved that the remuneration to visiting faculty at Confucius Institute, University of Mumbai be not changed.

Uni sports Pavilion

बाब ४: **सर्व विद्याशाखांतील संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांना वार्षीक क्रीडा योगदान (Annual Sports Contribution) ठरविणे बाबत.**

सदर बाब पुरेशा माहिती अभावी परत पाठविण्यात यावी.

Theatre Arts

बाब ५: **मुंबई विद्यापीठाच्या अकॅडमी ऑफ थिएटर आर्टस् या विभागाच्या 'रंगमंडळ' स्थापनेस मान्यतेबाबत. (व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक १७ मे, २०१७ रोजीच्या सभेतील बाब क्र.६२ नुसार).**

ठराव : असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठाच्या अकॅडमी ऑफ थिएटर आर्टस् या विभागाच्या रंगमंडळाच्या स्थापनेकरिता उत्तेजन म्हणून १५ लाख रूपये मंजूर करण्यात यावेत. अकॅडमी ऑफ थिएटर आर्टस्ने १५ लाखांचा सुयोग्य प्रस्ताव सादर केल्यानंतर कामगिरीच्या आधारावर १० लाख रूपयांची अधिकची तरतुद करण्यात येईल. तसेच 'रंगमंडळ' हे व्यवसायिक उपक्रम असल्याने कायदेशीर सर्व तरतुदी तपासून घेण्यात याव्यात व रंगमंडळाची सल्लागार समिती प्रशासकीय स्तरावर माननीय कुलगुरूंच्या मान्यतेनंतर स्थापन करण्यात यावी.

Mumbai School of Economics & pub. Policy F&A

बाब ६: **Item for the financial assistance to the M.A. (Economics) needy students of the Mumbai School of Economics & Public Policy (MSE-PP).**

ठराव : सदर विषयावर चर्चा करताना सदस्यांनी व्यवस्थापन परिषदेची विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरील संवेदनशीलता व्यक्त केली.

सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, सदर विद्यार्थ्यांना मासिक रुपये ४० हजार देण्याकरिता विभागाकडील उपलब्ध निधी, निधीचे स्त्रोत इत्यादी बाबत विस्तृत माहितीसह सदर बाब वित्त व लेखा समितीमार्फत व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर करण्यात यावी.



व्यवस्थापन परिषद - ११ जानेवारी २०१८ - बाब क्र.-१

दुरूस्ती १ - पान क्र ३, बाब क्र. ६, दुसरा परिच्छेद व दुसरी ओळ "४० हजार" ऐवजी "४० हजार (४ हजार प्र.म. x १० विद्यार्थी)" असे वाचावे.

COE EXAM Common

बाब ७: **विधि विद्या शाखेतील पदवी अभ्यासक्रम चालविण्याऱ्या महाविद्यालयांनी एप्रिल, २०१५ च्या परिक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर Practical Training या विषयांचे गुण विद्यापीठास सादर केल्यामुळे निकाल जाहिर करण्यास होणाऱ्या विलंबाबाबत संबंधीत महाविद्यालयांवर परिक्षा मंडळाने दिनांक ४ मे, २०१६ रोजीच्या बैठकीत केलेल्या शिफारसीप्रमाणे दंडात्मक कारवाई सुचविण्याबाबत.**

ठराव : याबाबत सखोल चर्चा केल्यानंतर असा ठराव करण्यात आला की, महाविद्यालयांना दंड केला असता तो दंड महाविद्यालयांनी भरला आहे किंवा नाही तसेच, प्रशासकीय व्यवस्थेमध्ये नेमका कोठे विलंब झाला व यांस कोण जबाबदार आहेत याबाबतचा अहवाल सादर करण्यात यावा.

बाब ८: **Report of the Internal Complaints Committee on the complaint of Ms. Harshali Khandare against Dr. Mahendra Bhavre.** TASS

ठराव : After detailed discussion, it was resolved that the report of Internal Complaint Committee be accepted partially and in accordance therewith one increment and promotion of Dr. Bhavre be withheld for one year. Further, it was resolved that Dr. Bhavre be not allowed to hold any position in any University Authorities/Bodies/Committees for one year.

बाब ९: **किशिनचंद चेलाराम कॉलेज, चर्चगेट या महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकांच्या मुलाखती घेणेसाठी निवड समितीची बैठक १५ दिवसांच्या आत घेतल्याने (परिपत्रक दि.३/३/१९८८ चे उल्लंघन केल्याने) आठ दिवसाचा कालावधी क्षमापित करून सहायक प्राध्यापकांना मान्यता देण्याबाबत.** TASS (CT)

ठराव : असा ठराव करण्यात आला की, किशिनचंद चेलाराम कॉलेज, चर्चगेट या महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकांच्या मुलाखती घेताना निवड समितीची बैठक १५ दिवसांच्या आत घेऊन परिपत्रक क्र.CONCOL/75 of 1988 दिनांक ३/३/१९८८ चे उल्लंघन केल्याने सहायक प्राध्यापकांना एका वर्षाकरिता हंगामी सहायक प्राध्यापक म्हणून मान्यता देण्यात यावी. तसेच, महाविद्यालयाने विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे नविन जाहिरातीची प्रक्रिया करून नव्याने भरती प्रक्रिया राबवावी.

**बाब १०: श्री सुजित कुमार यांनी गुरू नानक खालसा महाविद्यालयातील शिक्षकांच्या नियुक्ती तसेच वयोवाढीच्या प्रस्तावासंदर्भात तक्रारी बाबत प्राचार्य (डॉ.) एस. टी. गडदे — अध्यक्ष, प्राचार्य (डॉ.) मारोती भगत—सदस्य, श्री सुनिल मंत्री—सदस्य) या त्रिसदस्यीय समितीने दिलेला अहवाल विचारार्थ सादर.** TASS (CT)

ठराव : श्री सुजित कुमार यांनी गुरू नानक खालसा महाविद्यालयातील शिक्षकांच्या नियुक्ती तसेच वयोवाढीच्या प्रस्तावासंदर्भात तक्रारी बाबत प्राचार्य (डॉ.) एस. टी. गडदे — अध्यक्ष, प्राचार्य (डॉ.) मारोती भगत—सदस्य, श्री सुनिल मंत्री—सदस्य) या त्रिसदस्यीय समितीने सादर केलेला अहवाल मान्य करण्यात आला.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, वरील समितीने सादर केलेल्या अहवालाचा सखोल अभ्यास करुन पुनरावलोकन करण्यासाठी व त्यानुसार कार्यवाही करण्यासाठी खालील सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी:—

१) प्रा. डॉ. रश्मी ओझा — (निमंत्रक)
२) प्रा. डॉ. गौतम गवळी
३) प्रा. डॉ. मुरलीधर कु—हाडे

**बाब ११: To finalise the tenure terms and conditions and honorarium to be given to Prof. Dhiren Patel, Director, VJTI, Mumbai as Technical Adviser to the Vice-Chancellor, University of Mumbai.** Estab

ठराव : It was resolved that, the matter regarding finalization of the tenure, terms and conditions and honorarium to be given to Prof. Dhiren Patel, Director, VJTI, Mumbai as Technical Adviser to the Vice-Chancellor, University of Mumbai, be referred to the office of the Chancellor for perusal and guidance.

**बाब १२: Copy of the MOU and proposal for setting up of Wadhawani Institute of Artificial Intelligence (WIAI) for Social Good in Maharashtra for consideration.** Engg Com. Sci APD

ठराव : It was resolved that the Memorandum of Understanding between the Wadhawani Institute of Artificial Intelligence (WIAI) and University of Mumbai on behalf of Government of Maharashtra, for setting up of Wadhawani Institute of Artificial Intelligence for Social Good in Maharashtra, be accepted in principle.

Further, it was also resolved that a separate Agreement between the Wadhawani Institute of Artificial Intelligence (WIAI) and University of Mumbai be prepared and draft Agreement be referred to Legal Adviser for legal opinion and the same be placed before the Management Council.

The Management Council has appreciated the efforts made by Hon'ble Vice-Chancellor for setting up Wadhawani Institute of Artificial Intelligence through the University of Mumbai.

**बाब १३: "प्रो. बाळ आपटे सेंटर फॉर स्टडीज इन स्टुडंटस् ॲण्ड युथ मुव्हमेंट" स्थापन करणेबाबत.**

R
APP
AAU
कार्यालय

ठराव : असा ठराव करण्यात आला की, "प्रो. बाळ आपटे सेंटर फॉर स्टडीज इन स्टुडंटस ॲण्ड युथ मुव्हमेंट" स्थापन करण्यासंबंधी विद्वत परिषदेच्या दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी बाब क्र. ७.४ अन्वये पारित केलेल्या ठरावास मंजुरी देण्यात आली.

सदर सेंटरसाठी पदांची निर्मिती, इमारत व अन्य पायाभूत सुविधांसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

**बाब १४: मुंबई विद्यापीठात "बाळासाहेब ठाकरे अध्यासन" सुरू करण्याचा प्रस्ताव.**

APD
AAU
कार्यालय

ठराव : असा ठराव करण्यात आला की, मुंबई विद्यापीठात "बाळासाहेब ठाकरे अध्यासन" सुरू करण्याच्या प्रस्तावास विद्वत परिषदेच्या दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी बाब क्र. ७.२ अन्वये पारित केलेल्या ठरावास मंजुरी देण्यात आली.

सदर अध्यासनास शासनातर्फे जास्तीत–जास्त निधी उपलब्ध व्हावा यासाठी विद्यापीठ प्रशासनाने पाठपुरावा करावा.

सभेमध्ये सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे आभार व्यक्त करून अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे कुलसचिवांनी घोषित केले.

व्यवस्थापन परिषद - ११ जाने - 2018 - बाब क्र - १ (६)
दुरुस्ती २ - पान क्र. ६, बाब क्र. १४, तिसऱ्या परिच्छेदाचा समावेश करावा
चर्चेच्या अनुषंगाने प्रबोधनकार ठाकरे यांच्या नावाने अशाप्रकारचे केंद्र सामाजिक सलोखा राखण्याच्या दृष्टीने विद्यापीठात स्थापन करणेबाबत विद्यापीठाने विचार करावा, असे मत प्रा. डॉ. गौतम गवळी यांनी व्यक्त केले. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

सभेमध्ये सहभाग घेतल्याबद्दल सर्व उपस्थित सन्माननीय सदस्यांचे आभार व्यक्त करून अध्यक्षांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे कुलसचिवांनी घोषित केले.

सहायक कुलसचिव

उपकुलसचिव

कुलसचिव

प्र-कुलगुरू

कुलगुरू